**विधान भवन**
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२.

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ५७४३ /म.वि.स./क-१
दिनांक : २५/०३/२०२६

**प्रति,**

**या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी.**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**विषय :- या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सन २०२५-२०२६ या वर्षाच्या कार्यमूल्यमापन अहवालासंदर्भात...**

**संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.१/११/२०११.**
**२) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१३/प्र.क्र.५५/कोषा प्र-५, दि.०९/०७/२०१३.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाधीन विषयाच्या अनुषंगाने आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, या सचिवालयातील गट-अ ते गट-क या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्या सन २०२५-२०२६ या वर्षाच्या कार्यमूल्यमापन अहवालांचे कार्यमूल्यांकन संदर्भाधीन शासन निर्णयामधील तरतुदींच्या अनुषंगाने खालील नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावे.

**अ.** "गट अ" आणि "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील शासकीय अधिकारी तसेच गट ब" (अराजपत्रित) आणि "गट क" मधील शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना कार्यमूल्यमापन अहवालाचे कोरे फॉर्म वितरित केल्यानंतर सदरहू कार्यमूल्यमापन अहवालाचे फॉर्म स्वयंमुल्यनिर्धारण करुन तसेच प्रतिवेदन अधिकाऱ्याने भाग-३ चे कार्यमूल्यांकन करुन **गुरुवार, दिनांक ३० एप्रिल, २०२६** रोजीपर्यंत "क-१" आस्थापना कक्षास सादर करावे.

**सदरहू प्रक्रिया सुलभ पार पाडण्याच्या दृष्टीने कोणत्याही परिस्थितीत संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याने किंवा प्रतिवेदन अधिकाऱ्याने परस्पर पुनर्विलोकन अधिकाऱ्यांकडे कार्यमूल्यमापन अहवाल पाठवू नयेत ते आस्थापना कक्षामार्फत पाठविण्यात येतील.**

**ब.** प्रतिवेदन अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले कार्यमूल्यमापन अहवाल **सोमवार, दिनांक ०४ मे, २०२६ रोजी** "क-१" आस्थापना कक्षाकडून पुनर्विलोकन अधिकाऱ्यांकडे भाग-४ चे कार्यमुल्याकंन करण्याकरीता पाठविण्यात येतील.

संबंधित पुनर्विलोकन अधिकाऱ्याने सदरहू अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल योग्य ते मूल्यांकन करुन **सोमवार, दिनांक १८ मे, २०२६ रोजीपर्यंत** "क-१" आस्थापना कक्षास सादर करावे.

..२/-

**क.** संस्करण अधिकाऱ्यामार्फत सर्व कार्यमूल्यमापन अहवालांचे संस्करण झाल्यानंतर गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रती सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना **मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत** देण्यात येतील व त्याबाबतची पोहोच घेण्यात येईल.

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास वित्त विभागाच्या दिनांक ०९ जुलै, २०१३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

मोहन काकड

**( मोहन स.काकड )**

उप सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.